## // ऋण-निर्देश //

आपण एखादे काम पूर्ण करण्याचा संकल्प केला की, असा आपला संकल्प पुरा झाला म्हणजे सुखद आनंद होतो तो काही आगळा वेगळा आणि अतीव गोड असतो.

"भूम तालुक्यातील आजची स्त्री - शिक्षणाची स्थिती - एक चिकित्सक अभ्यास" हा शोध प्रबंध पूर्ण करुन सादर करतांना मला देखील असाच अत्यानंद होत आहे. प्रस्तुत शोध प्रबंधाचा विषय आजच्या समाज परिवर्तनशील काळाशी अनुरुप व निगडीत आहे. अशा चिकित्सक अभ्यासाची काळाची गरज व आवाहन म्हणून जरुर आहे. प्रारंभी वाटले की, हा प्रकल्प साधा सोपा आहे पण चिकित्सक दृष्टया जस जसे अध्ययन करु लागले तसतसे विषयाचा विस्तार आणि व्याप्ती खूपच विशाल असल्याचे जाणवले. हे कांही असले तरी आता माघार नाही आता पुढेच पाऊल या जिद्दीने संकल्पित कार्यसिध्दीचा पाठपुरावा करण्याचे मनोमन ठरवून अंग झाडून कामास लागले.

माझ्या या चिकित्सक अध्ययन कार्यात मार्गदर्शक प्रा. डॉ. चंद्रकांत लांडगे व सौ. लांडगे यांनी मोलाचे अचूक सखोल व कौशल्यपूर्ण मार्गदर्शन केले. त्यांची मी शतशः ऋणी आहे.

बार्शी येथील शिक्षण महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. सी. बी. शितोळे, विद्यमान प्राचार्य चंद्रकांत मोरे, प्रा. के. ना. देशपांडे, आर. एन. इंगोले, प्रा. व्ही. एन. मोहिरे व श्री आर. एन. हजारे यांनी वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य केले, मी त्यांची आभारी आहे.

तसेच भूम येथील भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय ॲड. उत्तमराव गाडे व सचिव श्री. आर. डी. सूळ आणि रवींद्र माध्यमिक


....पुढे चालू ...

शाळेचे मुख्याध्यापक श्री. एम.एस. जवाहीरे व अन्य शिक्षक शिक्षीका यांचेही सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांची आभारी आहे.

उस्मानाबाद जिल्हा सांख्यिकी अधिकारी सन्माननीय श्री. तुपसमुद्रे साहेब यांनी प्रस्तुत विषयासंबंधी त्यांचेकडील उपलब्ध माहिती देऊन मला उपकृत केले त्याबद्दल त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. त्याच - प्रमाणे या संशोधन कार्यात भूम तालुक्यातील जिल्हा परिषद व खाजगी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी/विद्यार्थीनी यांचेही सहकार्य लाभलेले आहे. त्यांचीही आभारीआहे. माझे पति श्री. वसंतराव लगदिवे, व बंधू नंदकुमार आणि माझे परमपूज्य मातापिता, माझी बालके चि. वृषाली व वैभव यांचे कडूनही बहुमोल सहकार्य मिळत राहिले तेही विसरून चालणार नाही.

माझ्या या शोध प्रबंधाचे टंकलेखन श्री. चंद्रकांत खिरसागर [शितल टाईपरायटिंग इन्स्टिटयूट, बार्शी] यांनी करून दिले, त्याबद्दल त्यांची मी आभारी आहे. झेरॉक्सचे काम "श्री" झेरॉक्स यांनी वेळेवर करून दिले, पेन्टींगचे काम श्री. प्रकाश दळवी, मुखपृष्ठाचे काम श्री. राजा शिन्दे, तसेच या शोध प्रबंधाचे बाईडिंगचे काम श्री. सुनिल पिसे [प्रगती बाईडिंग वर्क्स, बार्शी] यांनी उत्कृष्ट व आकर्षक करून दिल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

अभ्यासक,
विद्या काशिनाथ घेवारे,
सहशिक्षिका,
रवींद्र हायस्कूल, भूम,
[जि. उस्मानाबाद].

दिनांक : २१/१२/१९९०.